मा. कुलगुरु, यांचे मान्यतेसाठी.
सादर —

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नासिक

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद (School Council)

बैठक क्र. 52

बैठक क्र.52 दि. 22.08.2019

इतिवृत्त —

---

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेची बैठक क्र. 52 दि. 22.08.2019 रोजी दुपारी १.०० ते ५.०० या वेळेत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीमधील शिक्षणशास्त्र विद्याशाखा बैठक सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

1. डॉ. कविता साळुंके — अध्यक्ष, प्र.संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
2. डॉ. संजिवनी महाले — सदस्य व सचिव, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद
3. प्रा.डॉ. एस.व्ही. चौधरी — सदस्य, इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटी , न्यू दिल्ली
4. डॉ. चंद्रकांत बोरसे — सदस्य, प्राचार्य, म.वि.प्र.चे बी.एड. कॉलेज, नाशिक
5. प्रा. प्रा.डॉ. उर्मिला धूत -- सदस्य, प्राचार्य, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, परभणी
6. प्रा. माधव पळशीकर -- सदस्य, सहयोगी प्राध्यापक, संगणकशास्त्र विद्याशाखा
7. डॉ.विजया पाटील- सदस्य, सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
8. प्रा. विजयकुमार पाईकराव सदस्य, सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
9. डॉ. डी.डी. पवार सदस्य, सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
10. डॉ. सुभाष सोनुने — सदस्य, सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
11. श्रीमती शर्मिष्ठा ओक निमंत्रित सदस्य, बी.एड. विशेष, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
12. डॉ. साधना लामतुरे निमंत्रित सदस्य, बी.एड. विशेष, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
13. श्री. शिवानंद कहाळेकर— निमंत्रित सदस्य, बी.एड. विशेष, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
14. श्री. ज्ञानेश्वर जाधव — निमंत्रित सदस्य, बी.एड. विशेष, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,

बैठकीस खालील पाच सदस्य त्यांच्या तांत्रिक अडचणीमुळे उपस्थित राहू शकले नाहीत.

- डॉ. अरुण जवळेकर -- सदस्य, निवृत्त प्राचार्य, चेंबुर बी.एड. कॉलेज, चेंबूर, मुंबई
- प्रा. डॉ. जयदिप निकम -- सदस्य, प्र.संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा
- डॉ. आर.बी. मानेकर-- सदस्य, निवृत्त प्राचार्य, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अकोला
- डॉ. हेमंत राजगुरु — सदस्य, सहयोगी प्राध्यापक, शैक्षणिक सेवा विभाग
- प्रा. डॉ. सुरेश पाटील -- सदस्य, सहयोगी प्राध्यापक, संचालक,मूल्यमापन विभाग

मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक.
अंतर्गत आवक क्र. : VC/10034
दि. 3 / 9 / २०१९

## कार्यवृत्तांत

| क्रमांक | उपक्रमांक | विषय |
|---|---|---|
| 52.1 | | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 01**<br>**उपस्थित सदस्यांचे स्वागत** |
| 52.2 | | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 02**<br>बैठक क्र. 51 च्या परिषदेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. ( सहपत्र-1) |
| 52.3 | | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 03**<br>मागील सभेच्या कार्यवाही अहवालास मान्यता देण्यात आली. (सहपत्र-2) |
| 52.4 | | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 04**<br>नविन शिक्षणक्रम सुरु करणेबाबत.. |
| | 52.4.1 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 05**<br>**बी.ए. बी.एड. शिक्षणक्रम सुरु करणेबाबत.....**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा NCTE च्या मार्गदर्शक तत्वानूसार बी.ए. बी.एड., शिक्षणक्रम सुरु करु इच्छिते, त्यात शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि मानव्यविद्याशाखेतील विविध अभ्यासक्रमांचा समावेश असेल. सदर शिक्षणक्रम विद्याशाखेत सुरु करण्यास मान्यता मिळावी यासाठी सादर.<br>**निर्णय :** दूरशिक्षणाद्वारे बी.ए. बी.एड., शिक्षणक्रम सुरु करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. दूरशिक्षणाद्वारे एकात्मिक बी. ए. बी. एड. असा शिक्षणक्रम सध्या कोठेही अस्तित्वात नसल्याने या शिक्षणक्रमासाठी NCTE मार्गदर्शक तत्वानूसार अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यासंदर्भात एक उपसमिती नेमण्यात यावी. उपसमितीने तयार केलेल्या आराखडयासह NCTE कडे सदर प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविण्यात यावा. असा निर्णय घेण्यात आला. |
| | 52.4.2 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 06**<br>**दूरशिक्षणाद्वारे अध्यापक पदविका (डी.एल.एड.) सुरु करणेबाबत..**<br>दूरशिक्षणाद्वारे अध्यापक पदविका (डी.एल.एड.) शिक्षणक्रम सुरु करण्याचा विचार आहे. NCTE ने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानूसार सदर शिक्षणक्रम विकसित केला जाईल त्यास मान्यता मिळावी यासाठी सादर.<br>**निर्णय :** दूरशिक्षणाद्वारे अध्यापक पदविका (डी.एल.एड.) शिक्षणक्रम सुरु करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. NCTE कडे ऑफलाईन पध्दतीने सदर प्रस्ताव पाठवता येऊ शकेल असे सूचित करण्यात आले. |
| 52.4 | 52.4.3 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 07**<br>**शैक्षणिक मार्गदर्शन व समुपदेशन पदविका शिक्षणक्रम सुरु करणेबाबत..**<br>शिक्षणशास्त्र विदयाशाखेच्या वतीने शैक्षणिक मार्गदर्शन व समंत्रण (समुपदेशन) पदविका हा एक वर्ष कालावधीचा शिक्षणक्रम नव्याने विकसन करण्याचा मानस आहे. या शिक्षणक्रमात समंत्रण कौशल्य, सैध्दांतिक माहिती व केस स्टडीजची शास्त्रीय माहिती, प्रात्यक्षिके, व उदाहरणे इ.चा समावेश करता येईल. चर्चा व मान्यतेस्तव सादर..<br>**निर्णय :** शैक्षणिक मार्गदर्शन व समंत्रण (समुपदेशन) पदविका हा एक वर्ष कालावधीचा शिक्षणक्रम नव्याने सुरु करण्यास तत्वत: मान्यता देऊन सदर शिक्षणक्रमाची विद्वत परिषद |

| | | |
|---|---|---|
| | | मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. |
| | 52.4.4 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 08**<br>**शिक्षकांसाठी अध्यापनशास्त्र प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करणेबाबत..**<br>नविन शैक्षणिक धोरण 2019 मध्ये विविध स्तरावरील शिक्षकांना अध्यापनाशास्त्राबाबत उदबोधन करण्यात यावे असे सुचविण्यात आले आहे. शिक्षकांना उदबोधन करण्याच्या दृष्टीने शिक्षकांसाठी अध्यापनशास्त्र प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करावा असे शिक्षणशास्त्र विद्याशाखेस वाटते चर्चा व मान्यतेसाठी सादर.<br>**निर्णय :** इंजिनिअरींग मेडीकल आणि इतर क्षेत्रातील शिक्षकांसाठी अध्यापनशास्त्र प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करण्यास तत्वत: मान्यता देऊन सदर शिक्षणक्रमाची विद्वत परिषद मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. |
| | 52.4.5 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 09**<br>**शैक्षणिक आणि समाजशास्त्रीय संशोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करणेबाबत..**<br>सामाजिक आणि शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात संशोधनात्मक कार्य केले ज़ाते. प्रत्येक व्यक्तीला संशोधनाची पार्श्वभूमी नसते. म्हणून कोणत्याही क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींसाठी सदर शिक्षणक्रम सुरु करण्याचा शिक्षणशास्त्र विद्याशाखेचा विचार आहे. चर्चा व मान्यतेसाठी सादर.. (सहपत्र-3)<br>**निर्णय :** शैक्षणिक आणि समाजशास्त्रीय संशोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करणेसाठी मान्यता देऊन सदर शिक्षणक्रमाची विद्वत परिषद मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. |
| | 52.4.6 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 10**<br>**समावेशित शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करणेबाबत...**<br>समावेशित शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करणेबाबतचा विषय शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत गेल्या सभेत ठेवण्यात आला होता. तेव्हा त्यासाठीचे गरजा विश्लेषण अभ्यास करुन सदर विषय पुन्हा ठेवावा असा निर्णय घेण्यात आला होता. त्या अनुषंगाने समावेशित शिक्षण प्रमाणपत्र सुरु करण्याबाबत गरज विश्लेषण करण्यात आले आहे. शिक्षकांची ह्या शिक्षणक्रमाची गरज लक्षात घेऊन शिक्षणक्रमाची संरचना विकसित करण्यात येईल. विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर.. (सहपत्र-4)<br>**निर्णय :** समावेशित शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करण्यासाठी तत्वत: मान्यता देऊन सदर शिक्षणक्रमाची विद्वत परिषद मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. |
| 52.5 | 52.5.1 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 11**<br>**अंतर्गत गुण अंतिम परीक्षेनंतर प्राप्त झाल्यास दंडात्मक कार्यवाहीबाबत..**<br>अभ्यासकेंद्राकडून विविध शिक्षणक्रमांचे अंतर्गत कार्याचे गुण पाठविण्यात येतात. हे गुण देताना अभ्यासकेंद्राकडून चूक झाल्यास किंवा अभ्यासकेंद्राकडून वेळेत गुण प्राप्त न झाल्यास (अंतिम परीक्षेपूर्वी) प्रति विद्यार्थी किमान रु. 500/- आणि कमाल रु. 5,000/- आणि जास्तीत जास्त रु. 20,000/- इतका दंड आकारण्यात यावा, असा निर्णय परीक्षा समितीमध्ये घेण्यात आला आहे. हा निर्णय पदवी आणि त्यापुढील शिक्षणक्रमासाठी करण्यात यावा. परंतु प्रमाणपत्र व पदविका शिक्षणक्रमासाठी हा करण्यात येऊ नये विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर. (सहपत्र 5)<br>**निर्णय :** प्रमाणपत्र आणि पदविका शिक्षणक्रमासाठी दंडात्मक कार्यवाही करु नये असा निर्णय घेण्यात आला. कारण शिक्षणक्रमांचे शुल्क अत्यल्प आहे. ही अभ्यासकेंद्रे |

| | | |
|---|---|---|
| | | अशासकीय संस्थामार्फत चालविण्यात येतात. परंतु शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत केंद्राना त्याबाबत गांभीर्यपूर्वक समज देण्यात यावी असे सुचित करण्यात आले.<br>पदवी आणि पदव्युत्तर पदवीलाही तो लागु करु नये आणि आणि लागू करावयाचा असलाच तर रु. 5000/- पेक्षा जास्त दंड आकारु नये या शिफारशीसह सदर विषय पूर्नविचारार्थ पुन्हा परीक्षा समितीकडे पाठविण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला. |
| 52.6 | 52.6.1 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 12**<br>**एम.ए. (शिक्षणशास्त्र) आणि बी.एड. विशेष या शिक्षणक्रमांसाठी सुवर्णपदक देणेबाबत...**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील एम.ए. शिक्षणशास्त्र आणि बी.एड. विशेष शिक्षण या दोन शिक्षणक्रमांसाठी सुवर्णपदक देण्यात येत नाही. या दोन शिक्षणक्रमासाठी विद्यापीठामार्फत सुवर्णपदक देण्यात यावे व त्यासाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद विद्यापीठामार्फत करण्यात यावी चर्चा व मान्यतेस्तव सादर .<br>**निर्णय** : एम.ए. (शिक्षणशास्त्र) आणि बी.एड. विशेष या शिक्षणक्रमांसाठी सुवर्णपदक देण्यासाठी विद्यापीठामार्फत आर्थिक तरतूद करण्यात यावी असा निर्णय घेऊन देऊन सदर विषय मान्यतेसाठी विद्वत परिषदेकडे शिफारस करण्यात आली. |
| | 52.6.2 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 13**<br>**एम.ए. (एज्युकेशन) संशोधन कार्य गुणवत्तेबाबत...**<br>एम.ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रमाचे प्रबंध अभ्यासकेंद्रावर तपासले जातात<br>त्यानंतर त्या प्रबंधाचे परिशिलन विद्यापीठात करण्यात येते. ते आजपर्यंत परीक्षा विभागाकडून केले जात होते. नुकत्याच झालेल्या 36 व्या परीक्षा मंडळाच्या ठरावानुसार सदरचे परिशिलनाचे काम ह्यापूढे विद्याशाखेमार्फत करुन केवळ परिशिलनाचे गुण परीक्षा विभागास पाठवावे असा निर्णय घेण्यात आला. त्या संदर्भात तयार केलेली संशोधन अहवाल परिशिलन कार्यवाही व आर्थिक टिपण्णी चर्चा व मान्यतेस्तव सादर<br>(सहपत्र-6)<br>**निर्णय** : एम.ए. (एज्युकेशन) संशोधन कार्य गुणवत्ता कार्यवाही योजनेत पुढीलप्रमाणे बदल सुचवून त्यास मान्यता देण्यात आली.<br>1.एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्राकडून संशोधन आराखडे शिक्षणशास्त्र विद्याशाखेमध्ये मागविण्यात यावेत.<br>2. संशोधन आराखड्याचे परिशीलन विद्यापीठ प्रतिनिधी /बहिस्थ परीक्षकांकडून करण्यात यावे.<br>3. संशोधन आराखडा परिशीलनासाठी परीक्षकांना प्रशिक्षण देण्यात यावे.<br>4. बहिस्थ परीक्षक/ विद्यापीठ प्रतिनिधीला प्रती आराखडा रु. 100/- इतके मानधन इतर विद्याशाखांप्रमाणेच देण्यात यावे.<br>5.संशोधन अहवाल परिशिलनासाठी बहिस्थ परीक्षक/विद्यापीठ प्रतिनिधी यांना प्रति दिन रु. 1500/- इतके मानधन आणि बहिस्थ परीक्षकांना विद्यापीठाच्या नियमानुसार TADA देण्यात यावा.<br>सहपत्र क्र.6 मधे दिलेल्या योजनेतील उर्वरीत मुद्दे मान्य करण्यात आले आणि सदर योजना विद्वत परिषद आणि आर्थिक बाबींसाठी वित्त समितीकडे मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| 52.7 | 52.7.1 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 14**<br>**बी.एड. शिक्षणक्रम प्रवेश प्रक्रिया शुल्क वाढी बाबत..**<br>बी.एड. शिक्षणक्रमाचे प्रक्रिया शुल्क खुल्या प्रवर्गासाठी रु. 400/- आणि राखीव साठी.रु. 200/- होते. पारंपारीक बी.एड. 2019-21 प्रवेशासाठी महाराष्ट्र शासनाने सर्व प्रवर्गासाठी हे शुल्क रु. 800/-केले. मुक्त विद्यापीठाच्या बी.एड शिक्षणक्रमासाठीही ते 2019-21 या तुकडीसाठी खुला प्रवर्ग रु. 800/- व राखीव प्रवर्ग रु. 400/- करण्यास मान्यता मिळावी चर्चा व मान्यतेस्तव सादर.<br>**निर्णय :** बी.एड. शिक्षणक्रम प्रवेश प्रक्रिया शुल्क वाढीबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. आणि सदर प्रस्ताव वित्त समितीपुढे मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. |
| | 52.7.2 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 15**<br>**बी.एड. 2019-20 तुकडी प्रवेश नियम व प्रक्रिया मान्यतेस्तव सादर..**<br>बी.एड. 19-20 प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. नविन शासन नियमाप्रमाणे (GR) प्राप्त झालेल्याप्रवेश नियमावलीत 2019-20 या वर्षापासून काही बदल करण्यात आले आहेत. ते नियम व प्रक्रिया मान्यतेस्तव सादर. (सहपत्र-7)<br>**निर्णय :** बी.एड. 2019-20 तुकडी प्रवेश नियम व प्रक्रिया यांना कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| | 52.7.3 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 16**<br>**बी.एड. शिक्षणक्रम पूनर्रचना व केंद्र मानधन वाढी बाबत..**<br>बी.एड. शिक्षणक्रम पूनर्रचना व केंद्र मानधन वाढीचा प्रस्ताव विचारात घेऊन त्यामध्ये वाढ करण्यात आली आहे. मान्यतेस्तव सादर (सहपत्र 8)<br>**निर्णय :** बी.एड. शिक्षणक्रम पूनर्रचना व केंद्र मानधन वाढीबाबतच्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. सदर प्रस्ताव वित्त समितीपुढे मान्यतेसाठी ठेवण्याची शिफारस करण्यात आली. |
| 52.8 | 52.8.1 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 18**<br>**शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम पूर्नरचनेसाठी तज्ज्ञ सल्लागार समितीच्या नावांना कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत..**<br>शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमासाठी तज्ज्ञ सल्लागार समितीची बैठक घेण्यात आली. त्या पूर्नरचित शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचा आराखडा निश्चित करण्यात आला. तज्ज्ञ सल्लागार समितीच्या नावांना कार्यात्तर मान्यता मिळणेसाठी सादर. (सहपत्र-9)<br>**निर्णय :** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमासाठी सहपत्र क्र. 9 मधील तज्ज्ञ सल्लागार समितीच्या नावांना कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| | 52.8.2 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 19**<br>**शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम पाठ्यक्रम विकसन समिती तज्ज्ञांच्या नावास मान्यता मिळणेबाबत..**<br>शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम पूर्नरचनेचे कार्य विद्याशाखेने सुरु केलेले आहे. त्यासाठी तज्ज्ञ सल्लागार समितीने निश्चित केल्याप्रमाणे शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या विविध अभ्यासक्रमांचे पाठ्यक्रम विकसन करण्यासाठी दि. 13.5.2019 रोजी शि. विद्याशाखेमध्ये पाठ्यक्रम विकसन समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. |

| | | |
|---|---|---|
| | | त्यात पूर्नरचित शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या पाठ्यक्रम विकसनाचे कार्य करण्यात आले. अभ्यासक्रमनिहाय पाठ्यक्रम विकसन समिती तज्ज्ञांची नांवे कार्यात्तर मान्यतेसाठी सादर ( सहपत्र 10)<br>**निर्णय :** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम सहपत्र 10 मधील पाठ्यक्रम विकसन समिती तज्ज्ञांच्या नावांना कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| | 52.8.3 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 20**<br>**शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम पाठ्यक्रम विकसन समितीने विकसित केलेल्या पाठ्यक्रमास मान्यता मिळणेबाबत..**<br>शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या पूर्नरचनेसंदर्भात तज्ज्ञ सल्लागार समितीने निश्चित केलेल्या आराखड्याप्रमाणे व शि. विद्याशाखा परिषदेने मान्यता दिल्याप्रमाणे दि. 13.05.2019 रोजी शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या पाठ्यक्रम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यात पूर्नरचित शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या पाठ्यक्रम विकसनाचे कार्य करण्यात आले. पाठ्यक्रम कार्यात्तर मान्यतेसाठी सादर (सहपत्र-11)<br>**निर्णय :** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम सहपत्र 11 मधील पाठ्यक्रम विकसन समितीने विकसित केलेल्या पाठ्यक्रमास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| | 52.8.4 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 21**<br>**शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम पाठ्यक्रम विकसन समितीने विकसित केलेल्या पाठ्यक्रमाच्या लेखक समितीच्या तज्ज्ञांच्या नांवास मान्यता मिळणेबाबत..**<br>शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या विविध पाठ्यक्रमाचे लेखन कार्य करण्यासाठी तयार केलेल्या लेखक समिती तज्ज्ञांची नावे मान्यतेसाठी सादर. (सहपत्र-12)<br>**निर्णय :** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या सहपत्र 12 मधील विविध पाठ्यक्रमाचे लेखन कार्य करण्यासाठी तयार केलेल्या लेखक समिती तज्ज्ञांच्या नावांना मान्यता देण्यात आली. |
| | 52.8.5 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 22**<br>**बालसंगोपन आणि रंजन शिक्षण या शिक्षणक्रमाचे नावात बदल करणेबाबत..**<br>बालसंगोपन आणि रंजन शिक्षण या शिक्षणक्रमाच्या पूर्नरचनेचे कार्य सुरु आहे, त्यात तज्ज्ञ सल्लागार समितीने या शिक्षणक्रमाचे नविन नांव **'बालविकास प्रमाणपत्र शिक्षणक्रम'** (Child Development Certificate Program) असे करण्यात यावे. असे सुचित केले आहे. चर्चा मान्यतेसाठी सादर.<br>**निर्णय :** बालसंगोपन आणि रंजन शिक्षण ह्या शिक्षणक्रमाच्या नावात बदल करुन नवीन नांव **'बालविकास प्रमाणपत्र शिक्षणक्रम'** (Child Development Certificate Program) असे करण्यास मान्यता देण्यात आली. सदर विषय मान्यतेसाठी विद्वत्त सभेपुढे मांडण्याची शिफारस करण्यात आली. |
| | 52.8.6 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 23**<br>**बालविकास प्रमाणपत्र शिक्षणक्रम पाठ्यक्रम विकसन समितीस व विकसित केलेल्या पाठ्यक्रमास मान्यता मिळणेबाबत....**<br>बालविकास प्रमाणपत्र शिक्षणक्रम अभ्यासक्रमनिहाय पाठ्यक्रम विकसन समितीस व विकसित केलेल्या पाठ्यक्रमास कार्योत्तर मान्यता मिळणेसाठी सादर. (सहपत्र 13 व 14) |

| | | |
|---|---|---|
| | | **निर्णय :** बालविकास प्रमाणपत्र शिक्षणक्रम सहपत्र 13 व 14 मधील अभ्यासक्रमनिहाय पाठ्यक्रम विकसन समितीस व विकसित केलेल्या पाठ्यक्रमास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| | 52.8.7 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 24**<br>**बालविकास प्रमाणपत्र शिक्षणक्रम पाठ्यक्रम निहाय लेखन समितीस मान्यतेबाबत..**<br>बालविकास प्रमाणपत्र शिक्षणक्रम पाठ्यक्रमनिहाय समितीने विकसित केलेल्या पाठ्यक्रमाचे लेखन करण्यासाठी लेखक समितीस मान्यता मिळणेबाबत.. (सहपत्र 15)<br>**निर्णय :** बालविकास प्रमाणपत्र शिक्षणक्रम सहपत्र 15 मधील पाठ्यक्रमनिहाय समितीने विकसित केलेल्या अभ्यासक्रमाचे लेखन करण्यासाठी लेखक समितीस मान्यता देण्यात आली. |
| 52.9 | 52.9.1 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 25**<br>**प्रमाणपत्र शिक्षणक्रम अंतिम परीक्षा घेणेबाबत...**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत सहा महिने कालावधीच्या सर्व प्रमाणपत्र शिक्षणक्रमाची प्रवेश प्रक्रिया ऑक्टोबर अखेर पर्यंत चालते त्यानंतर विद्यार्थ्यांना पुस्तके पाठविण्यात येतात. त्यामुळे ह्या शिक्षणक्रमाची अंतिम परीक्षा मे महिन्यात इतर शिक्षणक्रमांबरोबर घेण्यास मान्यता मिळणेबाबत....<br>**निर्णय :** प्रमाणपत्र शिक्षणक्रम अंतिम परीक्षा मे महिन्यात इतर शिक्षणक्रमांबरोबर घेण्यास मान्यता देण्यात आली. सदर विषय मान्यतेसाठी विद्वत्त परिषदेपुढे मांडण्याची शिफारस करण्यात आली. |
| | 52.9.2 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 26**<br>**प्रमाणपत्र शिक्षणक्रम ऑफ लाईन पध्दतीने प्रवेश**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेमध्ये राबविण्यात येणाऱ्या प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने प्रवेशअर्ज करण्यात अनेक अडचणी येतात. म्हणून या स्तरावरील प्रवेश अर्ज ऑफलाईन पध्दतीने भरण्यास मान्यता असावी असे वाटते. चर्चा व मान्यतेसाठी सादर<br>**निर्णय :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेमध्ये कार्यान्वित केलेले प्रमाणपत्र शिक्षणक्रम अशासकिय संस्थांमार्फत कार्यान्वित केले जातात. हे विद्यार्थी अल्पशिक्षित असतात. संस्थांमध्येही संगणकाद्वारे कार्य करणारी पूर्ण वेळ व्यक्ती कार्यरत नसते. म्हणून ऑफलाईन पध्दतीने प्रवेश प्रक्रियेस मान्यता देण्यात आली परंतु याबाबत विद्यार्थी सेवा विभागाशी चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा असे सुचित करुन सदर विषय विद्वत परिषदेपुढे मान्यतेसाठी पाठविण्याची शिफारस करण्यात आली. |
| | 52.9.3 | **विषय क्र. बी.-1/एफ-175 / 2019 / 27**<br>**ऐनवेळचे विषय-**<br>**1. उत्कृष्ट अभ्यासकेंद्र पुरस्कार मार्गदर्शक तत्वे-**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील सर्व शिक्षणक्रमांच्या अभ्यासकेंद्रांना उत्कृष्ट अभ्यासकेंद्र म्हणून पुरस्कार देणेसाठी मार्गदर्शक तत्वे मान्यतेसाठी सादर. (सहपत्र 16)<br>**निर्णय :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील सर्व शिक्षणक्रमांच्या अभ्यासकेंद्रांना उत्कृष्ट अभ्यासकेंद्र म्हणून पुरस्कार देण्याच्या मार्गदर्शक तत्वास मान्यता देण्यात आली. संपूर्ण विद्यापीठात ही योजना राबविण्यात यावी यासाठी विद्वत परिषदेकडे शिफारस करण्यात आली. |

2. **Post Graduate Diploma In E-education in digital society (PGDEEDs) मूल्यमापन योजनेत बदलास मान्येतासाठी सादर**

शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे PGDEEDs शिक्षणक्रमाची पथदर्शक तुकडी राबविण्यात येत आहे. त्याच्या मूल्यमापनाबाबतची सविस्तर टिपण्णी सहपत्र 17 मध्ये देण्यात आलेली आहे. मान्यतेसाठी सादर. (सहपत्र-17)

**निर्णय :** Post Graduate Diploma In E-education in digital society (PGDEEDs) सहपत्र 17 मधील मूल्यमापन योजनेतील बदलास मान्यता देण्यात आली. या शिक्षणक्रमातील विविध कोर्सेसची उपयुक्तता लक्षात घेऊन भविष्यात Short term/ Faculty Development Programme मध्ये त्याचे रुपांतरण करावे असे सुचित करुन सदर विषय मान्यतेसाठी विद्वत्त परिषदेपुढे मांडण्याची शिफारस करण्यात आली.

3. **शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम अभ्यासकेंद्र शुल्क वाढ क्रणेबाबत..**

सदर शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्राने अभ्यासकेंद्र शुल्क वाढीबाबत मागणी केली आहे. त्याबाबतची सविस्तर टिप्पणी सहपत्र 18 मध्ये देण्यात आली आहे. मान्यतेसाठी सादर. (सहपत्र-18)

**निर्णय :** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम सहपत्र 18 मधील अभ्यासकेंद्र शुल्क वाढ करण्यास मान्यता देण्यात आली. आणि सदर विषय वित्त समितीच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

4. **शिक्षणशास्त्र निष्णात (एम.एड.) शिक्षणक्रम संशोधन अहवाल सादरीकरण मुदतवाढ देणेबाबत...**

NCTE च्या मान्यतेनूसार शिक्षणशास्त्र विद्याशाखेत सन1995 पासून एम.एड. शिक्षणक्रम राबविण्यात येत होता. NCTE ने 2015 पासून मुक्त विद्यापीठातून एम.एड.शिक्षणक्रम राबविण्यास मान्यता दिलेली नाही म्हणून सदर शिक्षणक्रम बंद करण्यात आलेला आहे. सन २०१४-१६ या तुकडीचा पुनर्रनोंदणी कालावधी जून २०२४ पर्यंत आहे. सन 1995 पासून ज्या विद्यार्थ्यांचे फक्त संशोधन कार्य अपूर्ण असल्यामुळे त्यांनी सदर शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला नाही, त्या सर्व विद्यार्थ्यांना एम.एड. शेवटच्या तुकडीचा पुनर्रनोंदणी कालावधी पर्यंत संशोधन अहवालाचे काम पूर्ण करुन मूल्यमापन करण्यासाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखेत सादर करण्यात येतील. संसोधन अहवाल मार्गदर्शक मानधन, अहवाल मूल्यमापन, मौखिक परीक्षा आणि अंतिम निकाल या विविध कार्यासाठी विद्यार्थ्याकडून रु. ५,०००/- शुल्क घेण्यास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय :** NCTE च्या मान्यतेनूसार एम.एड शिक्षणक्रम कार्यान्वित करण्यात येतो. परंतु प्रवेश प्रक्रियेबाबतचे नियम विद्यापीठाने निर्धारीत करावेत असे NCTE ने 2010 च्या नियमात म्हटले आहे. ज्या विद्यार्थ्यांचा पूर्ननोंदणी कालावधी आहे अशाच विद्यार्थ्यांना रु. 5000/- भरुन संशोधन अहवाल सादरीकरणास मान्यता देण्यात यावी. ज्या विद्यार्थ्यांचा नोंदणी व पूर्ननोंदणी कालावधी संपलेला आहे आणि ज्यांचे फक्त संशोधन कार्य अपूर्ण आहे त्याबाबत मा. कुलगुरुंची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करावी असा निर्णय घेण्यात आला. सदर विषयाची मान्यतेसाठी विद्वत सभा आणि वित्त सभेपुढे शिफारस करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| | | **5. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम पुर्ननोंदणी कालावधी ठरविणेबाबत...** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचा कालावधी तीन वर्ष आहे. हा कालावधी संपल्यानंतर विद्यार्थ्याला पुढील तीन वर्षासाठी पुनर्रनोंदणी कालावधी देण्यास मान्यतेसाठी सादर...<br>**निर्णय :** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचा कालावधी तीन वर्ष आहे. हा कालावधी संपल्यानंतर विद्यार्थ्याला पुढील तीन वर्षासाठी पुनर्नोंदणी कालावधी देण्यास मान्यता देण्यात आली. पूनर्नोंदणीच्या वर्षी सदर शिक्षणक्रमाचे जे शुल्क असेल त्यानुसार शुल्क घेण्यात येईल. सदर विषय मान्यतेसाठी विद्वत सभेपुढे शिफारस करण्यात आली.<br>**6. एम.ए. (शिक्षणशास्त्र) च्या अपूर्ण संशोधन कार्य च्या कार्यवाहीबाबत...**<br>एम.ए.(शिक्षणशास्त्र) च्या विद्यार्थ्यांचा नोंदणी कालावधी संपल्यानंतर पूर्ननोंदणीसाठी फक्त संशोधन कार्याचे शुल्क आकारुन शिक्षणक्रम पूर्ण करण्याची संधी देण्यात यावी व त्यासाठी खालीलप्रमाणे शुल्क आकारण्यात यावे निर्णयार्थ सादर<br>**निर्णय :**<br>एम.ए.(शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रम अपूर्ण संशोधन कार्य असणाऱ्या विद्यार्थ्यांनी संपूर्ण पूर्ननोंदणी शुल्क न भरता नोंदणी कालावधी संपल्यानंतर रु. 3000/- विद्यापीठ शुल्क आणि रु. 2000/-अभ्यासकेंद्र शुल्क असे एकूण रु. 5000/- शुल्क भरल्यानंतर त्यांचे संशोधन कार्य पूर्ण करुन घेण्यास मान्यता देण्यात आली. सदर विषय विद्वत सभा आणि वित्त समितीपुढे मांडण्याची शिफारस करण्यात आली. |

डॉ.संजीवनी महाले
सदस्य, सचिव
शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

डॉ.कविता साळूंके
प्र.संचालक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

Y.C.M.O.U., Nashik * School of Education *

मा. कुलगुरु ह्यांचे मान्यतेसाठी सादर-

मा. कुलगुरू